महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ४२-२२** **दिनांक ०८/०२/२०२२**

**"डॉक्टर महिलेच्या डोक्यात हातोडयाने दुखापती करुन, जबरीने दागीणे चोरणा-या" आंतरराष्ट्रीय आरोपीतास गुन्हे शाखा कक्ष-१ व मध्यवर्ती गुन्हे कक्ष यांचे संयुक्त कारवाईने अटक"**

दिनांक २३/०१/२०२२ रोजी १२.०० वा.चे सुमारास ओम क्लिनीक मुर्धा गांव भाईदर पश्चिम येथे फिर्यादी नामे गायत्री जयस्वाल वय-३६ वर्षे, व्यवसाय-डॉक्टर रा. विहार बिल्डींग, ६० फुटी रोड, जैन मंदिर जवळ भाईंदर प. या त्यांचे ओम क्लिनीक मध्ये असतांना एक अनोळखी इसम नांव पत्ता माहीत नाही. वय ३५ ते ४० वर्षे अंगाने जाड व उंच मास्क लावलेला येवुन त्याने फिर्यादी यांना "मला दुबईला जायचे आहे, त्या करीता मला आर.टी.पी.सी.आर. टेस्ट करायची आहे" असे सांगीतले तेव्हा फिर्यादी यांनी त्यांस आर.टी.पी.सी.आर. टेस्टच्या रजीस्ट्रेशन साठी आधारकार्ड लागेल असे सांगीतले असता तो इसम उद्या आधारकार्ड घेवुन येतो असे सांगुन निघून गेला. थोडया वेळाने सदर इसम पुन्हा दवाखाण्यात येवुन फिर्यादीच्या डोक्यात कोणत्यातरी वस्तुने जोरजोरात मारुन फिर्यादीच्या डोक्यास जबर दुखापत करुन फिर्यादीचा मोबाईल फोन, सोन्याची चैन, अंगठी, रोख रक्कम एटीएम कार्ड, क्रिडीट कार्ड असा एकुण ९३,०००/- रु. किमतीच्या वस्तु फिर्यादीकडुन जबरदस्तीने हिसकावुन घेवुन गेले बाबत **भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा रजी. नं. ३६/२०२२ भा.द.वि.स. ४५२,३९७, व महाराष्ट्र वैद्यकिय सेवा व्यक्ती आणि वैद्यकिय सेवा संस्था हिंसक कृत्ये प्रतिबंध अधिनियम २०१० चे कलम ३,४ प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्हयातील घटनास्थळवरुन मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या विश्लेषनावरुन सदरचा गुन्हा **राशीद खान वय-५२ वर्षे, रा. निलमपार्क, नयानगर, मिरारोड पुर्व, ता. जिल्हा ठाणे मुळ रा. जमाला चाळ, पठाणवाडी, मालाड ईस्ट मुंबई-९७** याने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीताचा मुंबई, मिरा-भाईंदर, ठाणे शहर परिसरात शोध घेता सदर आरोपीत हा गुन्हयांतील अटक चुकविण्याकरीता गोरखपुर, लखनौ, राज्य उत्तर प्रदेश, पटना राज्य बिहार, कोलकत्ता राज्य पश्चिम बंगाल या ठिकाणी गेला असल्याचे निष्पन्न झाल्याने मा. पोलीस आयुक्त सो, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे आदेशान्वये, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांच्या तपास टिम वर नमुद राज्यात रवाना करण्यात आल्या होत्या. आरोपीत **राशीद खान वय-५२ वर्षे, रा. निलमपार्क, नयानगर, मिरारोड पुर्व,** हा कोलकत्ता राज्य पश्चिम बंगाल येथे मिळुन आल्याने त्यास गुन्हयांचे संबधाचे विचारपुस करता त्याने सदर गुन्हयांची कबुली दिली आहे.

सदर आरोपीत याने यापुर्वी मिरारोड येथे एका **६५ वर्षाच्या वृध्देच्या डोक्यात हातोडयाने ६ गंभीर दुखापती करुन, १,५०,०००/- रूपये किमतीचे सोन्याचे दागीणे जबरीने चोरी केली असुन त्याबाबत मिरारोड पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. I १२९/२०२१, भा.द.वि. कलम ३९४,३४ गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयांत आरोपीत हा जामीनावर सुटलेला आहे. आरोपीत याने** लोकांना सर्बीया येथे नोकरी लावण्याचे आमिश दाखवुन फसवणुक केल्याची कबुली दिली आहे. आरोपीत याचेवर मोटारसायकल चोरी बाबत मिरारोड पोलीस स्टेशन गुन्हा गु.नों.र.क्र. I १२८/२०२१, भा.द.वि. कलम ३७९ अन्वये दाखल तसेच आरोपीत डोंगरी पोलीस स्टेशन मुंबई येथुन ॲक्टीव्हा मो.स्कुटर चोरी बाबत डोंगरी पोलीस ठाण्यात गु.नों.र.क्र. I ७०/२०२१, भा.द.वि. कलम ३७९ अन्वये दाखल आहे. आरोपीत यास दुबई येथील गुन्हयांत शिक्षा लागलेली असुन व मालदिव येथे फसवणुकी केल्याची कबुली देत आहे.

सदरची कामगीरी श्री. डॉ. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, पोलीस निरीक्षक राहूल राख, सहा.पो.निरी. कैलास टोकले, सहा.पो.निरी सरक, नितीन बेंद्रे, अमोल आंबवने पोउपनिरी. हितेंद्र विचारे, कैलास सोनावणे, सहा.फौ. राजु तांबे, पो.हवा. संजय शिंदे, पो.हवा. अर्जुन जाधव,. संग्राम गायकवाड, पो.हवा.किशोर वाडीले पो.हवा मनोज तावरे, मुस्तकिम पठाण, पो. ना. विजय गायकवाड, पोयि सुमित जाधव, पो.ना. सचिन सावंत, पो.ना. पुष्पेंद्र थापा , पो.ना. शिवाजी पाटील, पो.ना. संतोष लांडगे, पो.कॉ. प्रशांत विसपुते, पो.कॉ. विकास राजपुत, पो.शि.सुमित जाधव, प्रशांत विसपुते, प्रविण पवार सर्व नेम गुन्हे शाखा कक्ष-१ तसेच मध्यवर्ती गुन्हे शाखा, यांनी कामगीरी केली आहे.

गुन्हयांचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अविराज कुराडे नेम. गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ हे करीत आहेत.